स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्या शाखातंर्गत इतिहास विषयाच्या

विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला संशोधन आराखडा

: विषय :

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतीकारकांच्या योगदानाचा ऐतिहासिक अभ्यास

(कालखंड - इ.स. १८१८ ते इ.स. १९४७)

: संशोधक :

गजानन गणपत होडे

(एम.ए.,सेट–इतिहास)

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

(महात्मा गांधी हायस्कूल व ज्यु. कॉलेज, इगतपूरी,जि.नाशिक)

: मार्गदर्शक :

डॉ.मुटकुळे आर.आर.

(इतिहास विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक, बहिर्जी स्मारक कॉलेज बसमत, जि.हिंगोली)

प्रस्तावना :

१७ व्या शतकाच्या पुर्वाधात इंग्रज व्यापाऱ्यांनी भारतात शिरकाव केला. त्यानंतर दिडशे वर्षांनी भारताच्या राजकारणात १७५७ च्या प्लासी युध्दाने चंचू प्रवेश केला. प्लासी युध्द फंदफितुरीने जिंकून ब्रिटिशांनी आपल्या सत्तेची मुहूर्तमेढ भारतात रोवली. त्यानंतर ब्रिटीशांनी इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त करून मराठी साम्राज्य ब्रिटीश साम्राज्यात विलीन केले व अल्पावधीतच संपूर्ण भारतात ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरू झाला.

इंग्रजी सत्ता भारतात मजबूत व विस्तारत होत असतांना ब्रिटीशांनी विविध जमिन महसूलाच्या पध्दती सुरू केल्या. त्यात प्रामुख्याने कायमधारा पध्दत, महालवारी पध्दत व रयतवारी पध्दत यांचा समावेश होतो. ब्रिटीशांनी सारा वसूलीचे सक्तीचे धोरण स्विकारले. आदिवासींच्या जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली. आदिवासींच्या जमिनींवर कर बसविला. जंगलातील उत्पादनावर आपला अधिकार ब्रिटीशांनी स्थापन केला. त्यामुळे संतप्त झालेल्या आदिवासींनी इंग्रजांच्या विरोधात शस्त्र हाती घेतले. छोटा नागपूर परिसरातील कोलाम, हो, ओडिशातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी, भिल्ल, रामोशी, बिहार मधील संथाल, मुंढा आदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केले.

इ.स. १८५७ चा उठाव हा भारताच्या इतिहासातील परीवर्तनाचा एक असाधारण महत्वाचा बिंदू होय. मात्र या उठावाची बीजे या पुर्वी झालेल्या आदिवासी जमातींच्या सशस्त्र उठावतच रूजलेली होती. इ.स.१८५७च्या उठावात महाराष्ट्रातील आदिवासी जमातींनी सक्रीय सहभाग घेतला होता. नाशिक जिल्ह्यातील भिल्ल, महादेव कोळी, ठाकूर, कोकणा, वारली या आदिवासी जमातींनी इ.स.१८५७ च्या सशस्त्र उठावात ब्रिटीशांच्या विरोधात संघर्ष केला होता.

इ.स.१८५७ ते १८८५ या काळात ब्रिटीशांनी दडपशाहीचे धोरण स्वीकारले याचा परिणाम भारतात क्रांतीकारी चळवळी अधिक जोमाने सुरू झाल्या. भारतीयांचा असाच असंतोष राहिला तर राज्य करणे सोपे नाही. हे ब्रिटीशांनी ओळखले त्यातूनच एक प्रकारचे सुरक्षा कवच म्हणून २८ डिसेंबर १८८५ मध्ये ॲलन ऑक्टोव्हियन ह्युम यांच्या पुढाकाराने मुंबई येथील अधिवेशनात राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. इ.स. १८८५ ते १९४७ या दरम्यान राष्ट्रीय सभेचे तीन कालखंड आहेत. १) इ.स.१८८५ ते १९०५– मवाळ कालखंड २) इ.स. १९०५ ते १९२०– जहाल कालखंड ३) इ.स. १९२०– ते १९४७ गांधी युग. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची चळवळ राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून सुरू झाली. याच दरम्यान भारतात क्रांतीकारी चळवळींनीही वेग घेतला होता. यामध्ये आदिवासी जमातींनी दिलेले योगदान हे महत्वपूर्ण आहे.

भारतीय स्वातंत्र्यासाठी इंग्रजांबरोबर प्रारंभीचे जे लढे झाले ते आदिवासींनीच दिले आहेत. इंग्रजांबरोबर लढून, संघर्ष करून ज्या आदिवासी क्रांतीकारकांनी प्राणांची आहूती दिली आहे. आदिवासी समाज कायमच त्याग, तपश्चर्या, ज्ञान, वैराग्य, राष्ट्रभक्ती व नि:स्वार्थ सेवावृत्ती या गुणांनी संपन्न आहे. भक्ती आणि वैराग्याने नटलेल्या आदिवासींच्या आयुष्यात शौर्य, पराक्रम ओतप्रोत भरलेला आहे. आपल्या देशाचं रक्षण करण्यासाठी वेळोवेळी त्यांनी केलेल्या पराक्रम व बलिदानाच्या गाथा या तर इतिहासाचा अनमोल ठेवा आहे. या आदिवासी क्रांतीकारकांमध्ये वीर बिरसा मुंडा, रामजी भांगरे, राघोजी भांगरे, रामा किरवा, गोविंदराव खाडे, भागोजी नाईक, तंट्या भील्ल, सिध्दू, कांन्हू, उमाजी नाईक, ख्वाजा नाईक, राणी गायदनलू अशी कीतीतरी आदिवासी क्रांतीकारक होऊन गेले. त्यांच्या पराक्रमाचा व बलिदानाचा इतिहास प्रेरणादायी आहे.

विषय निवडीमागची भूमिका:

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा व क्रांतीकारी चळवळींचा अभ्यास करतांना असे लक्षात आले की, यामध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतीकारकांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास आदिवासी क्रांतीकारकांचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. हा सुवर्ण अक्षरांनी लिहीलेला इतिहास पूर्ण करावयाचा असेल तर, आदिवासी समाजातील क्रांतीकारकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान सर्व समाजासमोर येणे आवश्यक आहे. नाशिक जिल्ह्याचा विचार करता पेठ, सुरगाणा, दिंडोरी, कळवण, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी या तालुक्यांमध्ये साधारणपणे ९० ते ९५% आदिवासी जमाती आहेत. तर चांदवड, सटाणा, निफाड, सिन्नर येथे ५० ते ६०% दरम्यान आदिवासी जमाती आढळून येतात. यामध्ये प्रामुख्याने महादेव कोळी, कोकणा, ठाकूर, वारली, भील्ल या आदिवासी जमातींचा समावेश आहे. त्यामूळे महाराष्ट्राचा विचार करता नाशिक जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी जमातींनी इ.स.१८१८ ते १८५७ या कालखंडात ब्रिटीशांविरूध्द सशस्त्र उठाव केलेले आढळतात. तसेच इ.स. १८५७ च्या उठावातही नाशिक जिल्ह्यातील आदिवासींनी पेठमध्ये सशस्त्र उठाव केला होता. त्यानंतरच्या इ.स.१८५७ ते १९४७ दरम्यान झालेल्या विविध क्रांतीकारी चळवळींमध्ये स्वातंत्र्य लढ्यामध्ये आदिवासी समाजाने सक्रीय सहभाग घेतला होता. आदिवासी क्रांतीकारकांच्या

पराक्रमाचा व बलिदानाचा इतिहास समाजापूढे पुन्हा नव्याने मांडणे गरजेचे आहे, जेणे करून त्याकडे सर्व भारतीयांचे विशेष: आदिवासी तरूणपिढीची दृष्टी वेधता येईल. या दृष्टीकोनातून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये नाशिक जिल्हयातील आदिवासी क्रांतीकारकांच्या योगदानाचा अभ्यास(इ.स. १८१८ ते १९४७) या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

०१) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारकांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

०२) आदिवासी क्रांतीकारकांच्या कार्याची माहिती समाज, शासन संस्था, स्वयंसेवी संस्था व युवापिढी यांना करून देणे.

०३) वंचित राहिलेल्या आदिवासी क्रांतीकारकांच्या योगदानाकडे लक्ष वेधणे.

०४) आदिवासी क्रांतीकारकांच्या योगदानाचे अभ्यासाअंती ठोस मुल्यमापन करणे.

संशोधनाची गरज :

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी जमातींचे योगदान महत्वपूर्ण ठरलेले आहे. आदिवासींनी आपल्या प्राणांची बाजी लावून देश स्वतंत्र करण्यासाठी केलेला संघर्ष, दिलेले लढे आणि त्यांनी केलेले प्राणत्याग स्वातंत्र लढ्याची साक्ष देतात. परंतू त्या आदिवासी हुतात्म्यांची, वीरांची इतिहासाने योग्य ती नोंद घेतलेली नाही. त्यामूळे आदिवासींनी स्वातंत्र्य लढ्यासाठी केलेले योगदान जनतेच्या समोर मोठ्या प्रमाणात आलेले नाही. आदिवासी हे केवळ जंगलात राहणारे लोक आहे अशीच त्यांची संभावना होत आलेली आहे. परंतू जंगलातील या अडाणी माणसाचे हृदय देशप्रेमाने ओथंबलेले आहे आणि देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्याची प्रेरणा त्यांनी देखील जागवली आहे. याबाबत सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

आदिवासींचा पहिला उठाव नांदगाव (जिल्हा नाशिक) जवळील मांडवद येथे इ.स.१८१८ साली भील्ल व महादेव कोळी जमातींनी केला. या उठावाचे नेतृत्व वीर रामजी भांगरे आणि रामा कीरवा यांनी केले होते. सह्याद्रिचा वाघ असा ज्यांचा उल्लेख केला जातो असे क्रांतीवीर राघोजी भांगरे इ.स. १८३० ते १८४८

यादरम्यान इंग्रजी सत्तेच्या विरोधात नाशिकमधील त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, सिन्नर याभागातील महादेव कोळी व भील्ल समाजाचे संघटन उभे केले होते. सिन्नर तालूक्यातील नांदूर शिंगोटे गावचा वीर भागोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली इ.स.१८५० ते १८५९ यादरम्यान नाशिक व नगर जिल्ह्यातील भील्ल लोकांनी उठाव केले होते.

इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात नाशिक हे ब्रिटिश विरोधी लढ्याचे प्रमुख स्थान होते. बहुतेक स्वातंत्र्य सैनिक हे दक्षिण नाशिक व उत्तर अहमदनगर येथील भील्ल होते. सुमारे ७००० भील्लांनी या लढ्यात सहभाग घेतला होता. तसेच अहमदनगर, नाशिक भागातील भागोजी नाईक व सातपुड्यात खानदेश मध्ये काजीसिंग हे उठावाचे प्रमुख नेते होते. इ.स. १८५७ च्या उठावाच्या वेळी महाराष्ट्रामध्ये पहिला उठाव पेठ तालूक्यामध्ये झाला. हा उठाव पेठचे राजे भगवंतराव यांनी भागोजी नाईक, भाऊ बोवाजी नाईक, फाल्दी खान यांच्या सहकार्याने केला होता. यामध्ये शेकडो आदिवासींनी आपल्या प्राणांची आहूती दिली होती. आदिवासींनी या उठावात टेमके(बांबू व लाकडाच्या जाड काठ्या) यांचा वापर केला. त्यांनतर त्या आळवाची बारी(पेठ) येथे टाकून दिल्या ब्रिटीशांनी त्या टेमक्यांची संख्या मोजली तर ती हजारहून जास्त आढळली. म्हणून त्या दरीला आजही '**हजार टेमक्यांची बारी**' असे म्हणतात.

५ डिसेंबर १८५७ च्या रात्री वासुदेव भगवंत जोगळेकर यांच्या नेतृत्वाखाली भिल्ल व ठाकूर यांच्या जमावाने नाशिक जवळील त्र्यंबकेश्वर येथील ब्रिटिश कचेरी व तिजोरी यावर हल्ला केला. या उठावात भाग घेणाऱ्यांत काहीजन हे त्र्यंबकेश्वरच्या आसपासच्या डोंगरातून आश्रयाला होते. या उठावातील पांडू ठाकूर यास नेटिव्ह पायदळ पलटणीचा कॅप्टन नूटॉल याने त्याच्या साथीदारांसह कैद केले होते. या उठावातील वासुदेव जोगळेकर यांना ७ डिसेंबर १८५७ ला त्र्यंबकेश्वर येथे लोकांसमक्ष फाशी देण्यात आले. इतर साथीदारांनाही कैद व फाशीची शिक्षा झाली.

दिंडोरी तालूक्यामध्ये फरारी म्हणून प्रसिध्द असलेले बेंडकूळे मामा व त्यांच्या सारखे अनेक फरारी यांनी जमीनदार, सावकार व इंग्रज यांच्या विरूध्द उठाव केले होते. त्यानंतर राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये कळवण, पेठ, सुरगाणा या तालूक्यांमध्ये जंगल सत्याग्रह झाले. अशा या

सशस्त्र उठावांचे, आंदोलनांचे पुन्हा नव्याने अधिक सखोल अभ्यास होणे गरजेचे वाटते. वंचित राहिलेल्या या आदिवासी जमातीतील क्रांतीकारकांचे योगदान समाजपुढे येणे गरजेचे वाटते. यामुळे भारतीय समाजाबरोबरच आदिवासी जमातींच्या पुढील पिढीला आपल्या वैभवशाली ऐतिहासिक वारशाची ओळख होईल.

विषयाची व्याप्ती :

आदिवासी जमातींनी डोंगरदऱ्यांमध्ये राहून प्रसंगी किल्यांचा, टेकड्यांचा आश्रय घेऊन ब्रिटीश सत्तेविरूध्द सशस्त्र उठाव केले. नाशिक जिल्हा आदिवासी जिल्हा असून यामधील पेठ, सुरगाणा, दिंडोरी, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, निफाड, सटाणा, सिन्नर या तालूक्यांमध्ये आदिवासी जमाती आहेत. त्यामूळे संशोधनासाठी नाशिक जिल्ह्याचा विचार केला आहे. आदिवासी क्रांतीकारकांची नाशिक जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी स्मारके, स्मृतीस्तंभ, चिरे अस्तित्वात आहे. त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन या विषयाचा अभ्यास केला जाणार आहे. प्रस्तूत संशोधनासाठी इ.स.१८१८ ते १९४७ हा कालखंड निश्चित केला आहे.

विषयाची मर्यादा :

०१) प्रस्तूत संशोधन हे नाशिक जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे.

०२) प्रस्तूत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालूक्यांपूरतेच मर्यादित आहे.

०३) प्रस्तूत संशोधन हे आदिवासी क्रांतीकारकांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानापूरते मर्यादित आहे.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुकेच का?

०१) नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतीकारकांचा समग्र व सखोल अभ्यास झालेला नाही.

०२) नाशिक जिल्ह्यामध्ये अनेक सशस्त्र उठाव झाले या उठावाची केंद्रे ही प्रामूख्याने आदिवासी तालुक्यांमध्ये आढळून येतात, त्यावर अजून पाहिजे तितका प्रकाश टाकलेला नाही.

गृहितके :

०१) नाशिक जिल्ह्यात आदिवासी समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

०२) नाशिक जिल्हयात आदिवासी क्रांतीकारकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

०३) नाशिक जिल्ह्यात आदिवासी क्रांतीकारकांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे.

०४)नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यांमध्ये ब्रिटीश, सावकार, जमिनदार यांच्या जुलमी अत्याचाराविरूध्द अनेक सशस्त्र उठाव, लढे, आंदोलने झाली.

संशोधन विषयाचा मागोवा :

आदिवासी जमाती व त्यांची जीवनशैली, आदिवासी क्रांतीकारक, आदिवासी साहित्य याबाबत डॉ.गोविंद गारे, प्रा.प्रभाकर मांडे, श्रीमती सरोजिनी बाबर, गोदाताई परूळेकर, अनुताई वाघ, डॉ.भा.व्यं. गिरिधारी, डॉ.विनायक तुमराम, प्राचार्य लक्ष्मण टोपले, श्री.सुधाकर पाटील, डॉ.बाळासाहेब घुटे आदिंनी संशोधन केले आहे. आता काही आदिवासी भागात कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्था व कार्यकर्ते यांनीही आदिवासी जमातींच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबाबत लिखाण करण्यास सुरूवात केली आहे.

अभ्यास पध्दती. संशोधनाची कार्यपध्दती व तंत्रे :

निरीक्षण, मुलाखत, क्षेत्रिय अभ्यास

०१) स्मृतीस्तंभ, स्मारके, चिरे, क्रांतीकारकांची निवासस्थाने, त्यांच्या एकत्रित येण्याची ठिकाणे यांना भेटी देणे व माहिती संकलीत करणे.

०२) स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीकारकांच्या वंशातील व्यक्तींच्या मुलाखती घेणे.

प्रकरणाची मांडणी :

प्रकरण : १ : प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, विषय निवडी मागची भूमिका, संशोधनाची उदिष्टे, संशोधनाची गरज, विषयाची व्याप्ती व मर्यादा, गृहितके, संशोधन विषयाचा मागोवा, प्रकरण योजना, समारोप, संदर्भ सूची इत्यादी बाबींचा समावेश केला जाणार आहे.

प्रकरण : २ : आदिवासी समाज जीवन

प्रस्तुत प्रकरणात आदिवासींची जीवनशैली, आदिवासींचे साहित्य,आदिवासींची संस्कृती, आदिवासींच्या उदरनिर्वाहाची साधने इत्यादी बाबींचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण : ३ : भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी क्रांतीकारक चळवळींचा आढावा.

प्रस्तुत प्रकरणात भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासींनी विविध उठाव केले. उदा. हो व चुआर जमातींचा उठाव, कोल विद्रोह, संथाल विद्रोह, अहोम उठाव, खासी उठाव, भिल्ल उठाव, रामोश्यांचा उठाव, खोंड विद्रोह, नागांचा उठाव इ. तसेच भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी क्रांतीकारकांनी केलेल्या योगदानाचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण : ४ : नाशिक जिल्यातील क्रांतीकारी चळवळींचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात सावरकर बंधूचे क्रांतीकारी चळवळीतील योगदान, नाशिक कट, जॅक्सन वधाचा खटला, क्रांतीकारी चळवळीत स्त्रीयांचा सहभाग इ. बाबींचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण : ५ : नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतीकारक व आदिवासींचे उठाव

प्रस्तुत प्रकरणात क्रांतीवीर राघोची भांगरे, क्रांतीवीर गोविंदराव खाडे, क्रांतीवीर भागोची नाईक, क्रांतीवीर रामजी भांगरा, क्रांतीवीर पांडू ठाकूर, फरारी बेंडकूळे मामा अशा अनेक आदिवासी क्रांतीकारकांनी केलेले सशस्त्र लढे तसेच पेठचा उठाव, हरसुलचा उठाव, त्र्यंबकेश्वरचा उठाव, चणकापूरचा उठाव, भारतछोडो आंदोलनात आदिवासींचे लढे इत्यादी बाबींचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण : ६ : समारोप व निष्कर्ष

BIBLIOGRAPHY

Primary Sources :

Source Material for A History of the Freedom Movement in Maharashtra / India.

01) Phatak, N.R. Source Material for History of the Freedom Movement in India, Vol. III 1930-31 Mahatma Gandhi, 1969

02) The History and Culture of India (Vol. IX) R.C.Mujumdar.

03) The History and Culture of India (Vol. XI) R.C.Mujumdar.

GAZETTEERS

01) Nashik District Gazetteer,

02) Gazetteers Department of Mhaarashtra, Bombay Second Edition - Revised 1975

03) Thane District Gazetteer

04) Ahamadnagar District Gazetter

संदर्भ सूची

०१) स्वातंत्र लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक – लेखक डॉ.गोविंद गारे

०२) आरसा – आदिवासी जीवनशैलीचा, भा.व्यं.गिरिधारी, पुजा कॉम्प्युटर्स, नाशिक २००३

०३) आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समिक्षा – डॉ.विनायक तुमराम, विजय प्रकाशन, नागपूर १९९४

०४) आदिवासींचे सण उत्सव, संपा. सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, १९९८

०५) १८५७ चे स्वातंत्र्य युध्द : पेटलेला दक्षिण हिंदुस्थान (Sounth India in 1857 War of Independence) मुळ लेखक – डॉ.वा.द.दिवेकर अनुवाद – वि.ग.कानिटकर मुद्रक – केसरी – मराठा ट्रस्ट पुणे

०६) भट, वि.म. अभिनव भारत अथवा सावरकरांची क्रांतीकार गुप्त संस्था १९५०

०७) १८५७ चे स्वातंत्र समर – स्वातंत्र्यवीर सावरकर

०८) सत्तावन्न ते सत्तेचाळी (खंड १ व खंड २) वि.स.वाळींबे

०९) ब्रिटीश रीयासत (खंड १ व खंड २) रियासतकार गो.स.सरदेसाई

१०) The Bhilas of Western India - 1906 - 07 Barnes E. Journal of Society of Arts.

११) Tribal Movements in India Vol. I & II K. Suresh singh, N.Delhi - 1982.

१२) Sen, S.N. History of the Freedom Movement in India (1857 - 1947). Wiley Eastern Ltd. Bombay 1993

मार्गदर्शक
डॉ.मुटकुळे आर. आर.
बी.एस.कॉलेज, बसमत , हिंगोली

संशोधक
गजानन गणपत होडे
महात्मा गांधी हायस्कुल अॅण्ड ज्यु.कॉलेज
इगतपूरी, जि.नाशिक